नवराष्ट्र

# क्विक हिलतर्फे रुग्णवाहिका भेट




**पुणे**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. क्विक हिल फाउंडेशन या क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने, पनवेल येथील आरएसएस जनकल्याण समितीसाठी त्यांच्या 'आरोग्य यान' उपक्रमाअंतर्गत, क्विक हिलने रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना चांगल्या आरोग्य सेवापुरवण्याकरिता अगदी नवी रुग्णवाहिका भेट दिली. आरएसएस जनकल्याण समिती या भागातील वंचित लोकांकरिता आरोग्य सेवा पुरवते तसेच नियमित आरोग्य तपासणीच्या योजना राबवते. क्विक हिल टेक्नोलॉजीजचे एमडी आणि सीईओ कैलाश काटकर, प्रणेत्या अनुपमा काटकर, विठ्ठल डाके, धैर्यशील जाधव, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर आणि उपाध्यक्ष विनायक दंभीर यांच्या उपस्थितीत या भेटीचा कार्यक्रम पार पडला.

Pune Plus Edition
11 June 2021 Page No. 4
epaper.navarashtra.com